www.rajdand.com
सातारा, शनिवार
06.01.2024
पृष्ठ : ४ | मुल्य : ४ | मार्गशीर्ष कृ.२४
rajdandlive
Reg.No.MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

स्थापना १९९९

संप सुटला, समस्येचं काय ?

(पान २ वर)



## अरबी समुद्रात मार्कोसची थरारक कारवाई

### अपहृत जहाजावरील १५ भारतीयांसह २१ जणांची सुटका

**मुंबई :** आफ्रिकेतील सोमालिया देशाजवळ गुरूवारी (४ जानेवारी) एका जहाजाचे अपहरण करण्यात आलं होतं. या जहाजावर १५ भारतीय सदस्यही काम करते होते. एमव्ही लीला नॉरफोक असं अपहरण झालेल्या जहाजाचं नावं होतं. अपहरणाची माहिती मिळाल्यानंतर भारतीय नौदल सक्रिय झाले. त्यानंतर आता एमव्ही लीला नॉरफोक जहाजावरील १५ भारतीयांसह २१ जणांची सुखरूप सुटका केली आहे.



उत्तर अरबी समुद्रात एमव्ही लीला नॉरफोक या जहाजाचं अपहरण केल्याची माहिती मिळताच भारतीय नौदलानं तातडीनं कारवाई केली. जहाजावरील १५ भारतीयांसह २१ सदस्यांची सुटका करण्यात आली आहे. मार्कोने (नौदल सैनिक) जहाजावर शोधमोहिम केली. पण, अपहरणकर्ते आढळून आले नाहीत, असं भारतीय नौदलानं म्हटलं आहे.

मार्कोसला जहाजावर अपहरणकर्ते आढळून आले नाहीत. सुटका करण्यात आलेल्या सदस्यांनी सांगितलं की, अपहरण करताना अपहरणकर्त्यांनी जहाजावर गोळीबार केला. त्यानंतर आश्रय घेऊन ते लपून बसले होते.दरम्यान, भारतीय नौदलाचे प्रमुख आर. हरी कुमार यांनी अरबी समुद्रात कार्यरत असलेल्या भारतीय युद्धनौकांना अपहकर्त्यांविरोधात कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.

## कुख्यात गुड शरद माहोळची पुण्यात दिवसाढवळ्या हत्या

### मुख्य आरोपीसह आठ जणांना खेड शिवापूर परिसरात अटक

पुणे : कोथरुडमध्ये गुंड शरद मोहोळ याचा पिस्तुलातून गोळ्या झाडून खून करण्यात आला. जर्मन बेकरी बॉम्बस्फोट प्रकरणातील आरोपी कातिल सिद्दीकीचा येरवड्यातील अतिसुरक्षित अंडासेलमध्ये कतिलचा मोहोळ आणि साथीदारांनी पायजम्याच्या नाडीने गळा आवाळून खून केला. कातिलच्या खुनानंतर देशभर शरद मोहोळ चर्चेत आला. गुंड संदीप मोहोळ याचा शरद मोहोळ विश्वासू साथीदार होता.



संदीपचा ४ ऑक्टोबर २००६ रोजी पौड फाटा चौकात भरदिवसा गोळ्या झाडून प्रतिस्पधी टोळीने खून केला होता. त्यानंतर शरद मोहोळ आणि साथीदारांनी निलायम चित्रपटगृह परिसरातील एका उपहारागृहात प्रतिस्पधी गणेश मारणे टोळीतील किशोर उर्फ पिंटू मारणे याच्यावर गोळीबार करुन खून केला होता. त्यानंतर येरवडा कारागृहातील अंडा सेलमध्ये जर्मन बेकरी बॉम्बस्फोट प्रकरणातील आरोपी कतिल सिद्धीकी याचा पायजम्याच्या नाडीने गळा आवळून खून केला होता.

यांप्रकरणात मोहोळ आणि त्याचा साथीदार अलोक भालेराव यांना अटक करण्यात आली होती. अतिसुरक्षित समजल्या जाणाऱ्या येरवड्यातील अंडा सेलमध्ये मोहोळ आणि भालेराव यांनी कतिलचा खून केल्यानंतर तो देशभर चर्चेत आला होता. सिद्धीक खून प्रकरणात तपास यंत्रणांकडून मोहोळची याप्रकरणात चौकशी करण्यात आली होती.

२६ जून २०१६ रोजी न्यायालयाने कतिल सिद्धीकी प्रकरणात मोहोळ अणि भालेरावची निर्दोष मुक्तता केली. त्यानंतर मोहोळ विविध राजकीय आणि सामाजिक कार्यक्रमात सहभागी होऊ लागला. त्याची पत्नीने भारतीय जनता पक्षाचे काम सुतारदरा परिसरात सुरू केले.

### साहिल पोळेकरसह आठ जणांना अटक

**गुंड शरद मोहोळ याच्या खून प्रकरणात पोलिसांनी खेड शिवापूर परिसरातून मुख्य आरोपी साहिल उर्फ मुन्ना पोळेकर याच्यासह आठ जणांना शुक्रवारी रात्री अटक केली.मोहोळचा शुक्रवारी दुपारी एकच्या सुमारास कोथरुडमधील सुतारदरा परिसरात पिस्तुलातून गोळ्या झाडून खून करण्यात आला. याप्रकरणी कोथरुड पोलीस ठाण्यात रात्री उशीरा गुन्हा दाखल करण्यात आला.**

**तपासात मोहोळच्या पूर्वीचा साथीदार साहिल ऊर्फ मुन्ना संतोष पोळेकर (रा. सुतारदरा, कोथरुड) आणि साथीदारांनी खून केल्याचे उघडकीस आले. हल्लेखोरांनी पकडण्यासाठी पोलिसांनी तपास सुरू केला. गुन्हे शाखेच्या पथकाने शुक्रवारी रात्री खेड शिवापूर परिसरातून मुख्य आरोपी साहिल पोळेकरसह आठ जणांना अटक केली.**

# ईडीच्या पथकावर पश्चिम बंगालमध्ये हल्ला

**कोलकाता : पश्चिम बंगालमध्ये ईडी अधिकाऱ्यांच्या पथकावर हल्ला झाल्यानंतर राज्यपाल सीव्ही आनंद बोस यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली आहे. हा हल्ला अतिशय निंदनीय असून राज्य सरकारला असे हल्ले थांबवावे लागतील. यानंतर राज्यपालांनी गृह सचिव आणि राज्याचे पोलिस महासंचालक यांना राज्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्यास बजावले. सीव्ही आनंद बोस म्हणाले, जर सरकार आपल्या मूलभूत कर्तव्यापासून परावृत्त होत असेल तर संविधान आपले काम करेल. पश्चिम बंगाल बनाना रिपब्लिक नाही. राज्य सरकारने लोकशाहीमधील रानटीपणा आणि गुंडगिरी थांबवायला हवी.**



सदर घटनेवर संताप व्यक्त करताना राज्यपाल म्हणाले, ही एक भयंकर घटना असून चिंताजनक आणि खेदजनक अशी आहे. लोकशाहीत जर रानटीपणा आणि विध्वंसक वृत्ती फोफावत असेल तर त्याला आळा घालणे हे सरकारचे कर्तव्य आहे. जर सरकार आपल्या मूलभूत कर्तव्यात कसूर करत असेल तर संविधान आपला मार्ग स्वीकारेल. यानंतर योग्य ती कारवाई करण्यासाठी माझ्याकडे असलेले सर्व घटनात्मक पर्याय खुले आहेत. निवडणुकीपूर्वी होणारा हिंसाचार ताबडतोब संपायला हवा.

पश्चिम बंगालमध्ये झालेल्या रेशन वितरण घोटाळ्याची चौकशी करण्यासाठी ईडीचे पथक तृणमूल काँग्रेसचे नेते शेख शाहजहाँ यांच्या उत्तर २४ परगना जिल्ह्यातील निवासस्थानी छापा टाकण्यासाठी जात होते. यावेळी रस्त्यातच ईडीच्या पथकावर हल्ला केला. अधिकाऱ्यांच्या वाहनांची तोडफोड करण्यात आली. शाहजहाँच्या समथर्कांनी ही तोडफोड केली असल्याची टीका भाजपाकडून केली जात आहे.

अधिकाऱ्यांनी सांगितले की, ईडीचे अधिकारी सकाळी शेख यांच्या निवासस्थानी जायला निघाले होते. तेव्हा तृणमूल काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने ईडीच्या आणि केंद्रीय सुरक्षा दलाच्या ताफ्याला घेरले. यावेळी त्यांनी ईडीच्या विरोधात घोषणाबाजी करत वाहनांवर हल्ला केला. ईडीच्या पथकाने निघून जावे, यासाठी गदीने दबाव टाकला होता.

हल्ला झाल्यानंतर ईडीच्या पथकाने आपली वाहने तिथेच सोडून मिळेल त्या मार्गाने तिथून पळ काढला. ईडीच्या एका अधिकाऱ्याने पीटीआयशी बोलताना सांगितले की, असा हल्ला होणे, आम्हाला अपेक्षित नव्हते. आमच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळावरून तात्काळ पळ काढला. केंद्रीय सुरक्षा दलावरही यावेळी हल्ला झाला.

### रोहित पवारांच्या कंपनीवर ED ची धाड

**बारामती :** बारामतीमधून मोठी बातमी समोर आलीय. शरद पवारांचे नातू आणि आमदार रोहित पवारांच्या बारामती ॲग्रोवर सक्तवसुली संचलनालयाची (ईडी) धाड पडल्याची माहिती मिळाली आहे. आज सकाळी ईडीचे पथक बारामती ॲग्रोमध्ये पोहोचले. या कंपनीच्या कार्यालयात अन्य लोकांना प्रवेश बंद करण्यात आला आहे. आमदार रोहित पवार यांची ही कंपनी आहे. विरोधी पक्षात असलेल्या रोहित पवारांच्या कंपन्या केंद्रीय व राज्यातील यंत्रणांच्या रडारवर आहेत. दरम्यान या प्रकरणी कंपनी प्रशासनानं कोणीही प्रतिक्रिया दिलेली नाही. केंद्रीय तपास यंत्रणांकडूनही अद्याप कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही.

हा आहे स्वाभिमानी महाराष्ट्राच्या पुरोगामी विचारांचा चेहरा ज्यांनी पिढ्यान्‌ पिढ्या महाराष्ट्रधर्म जपला आणि वाढवला अन्याया विरोधात प्रसंगी संघर्ष करण्याची शिकवणही या महान विभूतींनी दिल्याने महाराष्ट्र भूमीला संघर्षाचाही प्रदीर्घ इतिहास आहे. म्हणून मराठी माणूस या नात्याने महाराष्ट्र धर्म जपण्यासाठी आणि टिकवण्यासाठी प्रत्येकाला संघर्षाचीही तयारी ठेवावी लागेल, असं ट्विट रोहित पवारांनी केलं आहे.

### खरेदीच्या बहाण्याने दागिन्यांची चोरी; दोन महिलांविरुद्ध गुन्हा दाखल

**पुणे :** खरेदीच्या बहाण्याने सराफी दुकानामध्ये आलेल्या दोन बुरखाधारी महिलांनी १ लाख ९० हजारांच्या दागिन्यांची चोरी केली. लष्कर भागातील सुभाष ज्वेलर्समध्ये १ जानेवारी रोजी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. या प्रकरणी लष्कर पोलीस ठाण्यात दोन महिलांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बुरखा परिधान केलेल्या दोन महिला १ जानेवारी रोजी दागिने खरेदी करण्याच्या बहाण्याने सुभाष ज्वेलर्समध्ये गेल्या होत्या. त्यांनी दुकानातील कामगारांची नजर चुकवित दोन सोन्याच्या बांगड्या हातचलाखीने चोरून नेल्या. १ लाख ९० हजारांच्या बांगड्या चोरीला गेल्याचे लक्षात आल्यानंतर दुकानाच्या मालकाने पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलीस उपनिरीक्षक विजय बनसुडे तपास करीत आहेत.

## इंद्रायणी, पवना घेणार मोकळा श्वास



पिंपरी : पवना, इंद्रायणी आणि मुळा नदी पुनरुज्जीवन प्रकल्प राबविण्याची प्रक्रिया सुरू झाल्यानंतर आता उगमापासूनच प्रदूषण रोखण्यासाठी प्रशासनाने हालचाली सुरू केल्या आहेत. पिंपरी महापालिका, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए), जिल्हा प्रशासन, ग्रामस्थांच्या पुढाकारातून नदीकाठच्या गावांमध्ये सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) उभारण्याचे नियोजन केले आहे. पुढील दोन वर्षांत ही प्रक्रिया मागी लागून नदी प्रदूषण रोखण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

पिंपरी-चिंचवड औद्योगिकनगरी तीन नद्यांच्या खोऱ्यात आहे. शहराच्या उत्तरेकडून इंद्रायणी, दक्षिणेकडून मुळा आणि मध्यातून पवना नदी वाहते. मुळा व पवनेचा संगम जुनी सांगवी येथे झाला आहे. संगमापासून पुढे मुळा नावाने नदी ओळखली जाते. मुळा नदीचा उगम मुळशी तालुक्यात असून, शहरातील पात्र पुणे महापालिकेच्या हद्दीत आहे. केवळ उत्तरेकडील काठ पिंपरी-चिंचवड महापालिकेकडे आहे. पवना व इंद्रायणी नद्यांचा उगम मावळ तालुक्यात आहे. मामुडी येथून पवना नदी शहरात प्रवेश करते. इंद्रायणी नदीचे पात्र महापालिकेकडे असून, उत्तर काठ पीएमआरडीएच्या हद्दीत आहे. या दोन्ही नद्यांचे शहराच्या हद्दीतील पुनरुज्जीवन महापालिका करीत आहे. तर मुळा नदीचे पुनरुज्जीवन पुणे महापालिकेच्या सहकार्याने केले जाणार आहे. मात्र, नद्यांच्या उगमापासून शहराच्या हद्दीपर्यंतही मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असल्याचे आढळून आले आहे.

औद्योगिक वसाहती, नदीकाठच्या कारखान्यांतील रसायनयुक्त पाणी, गावांमधील मैलायुक्त पाण्यावर कोणतीही प्रक्रिया न करता थेट पवना, इंद्रायणी नदीपात्रात सोडले जाते. मैलायुक्त पाणी नद्यांना प्रदूषित करत आहे. यातील काही गावांत ग्रामपंचायत, नगरपंचायत, नगर परिषद, देहूरोड कटक मंडळ, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) आहे. काही गावांचा समावेश ह्यपीएमआरडीएह्नमध्ये झालेला आहे. त्यामुळे सर्वांनी मिळून नद्यांच्या प्रदूषणावर उपाययोजना करण्याची सूचना राज्य शासनाने केली होती. त्यानुसार प्रशासनाने कार्यवाही सुरू केली आहे.

लोणावळा, तळेगाव दाभाडे, आळंदी नगर परिषद, देहू, वडगाव नगरपंचायत, देहूरोड कटक मंडळ, कुसगाव बुद्रुक, कामशेत-खडकाळे, इंदुरी ही १५ हजारांपेक्षा अधिक लोकसंख्येची, तर कार्ला, वरसोली, कान्हेवाडी, येलवडी, आंबी, जांभूळ, कान्हे, गोळेगाव, सोळू, तुळापूर, मरकळ, नाणे, टाकवे बुद्रुक, सांगुडी, वडगाव शिंदे या १५ हजारांपेक्षा कमी लोकसंख्येच्या गावांत सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारले जाणार आहेत. उर्वरित २४ गावांचे गट करून प्रकल्प उभारला जाणार आहे. मावळचे खासदार श्रीरंग बारणे म्हणाले की, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारल्याने गावांमधील पाणी प्रक्रिया करूनच नदीत सोडले जाईल. राज्य सरकारच्या सहकार्याने पवना, इंद्रायणी नदी स्वच्छ, प्रदूषणमुक्त करण्याच्या दृष्टीने ही कामे कमी वेळेत पूर्ण केली जाणार आहेत. महापालिचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे म्हणाले की, उगम ते शहर या दरम्यान नद्यांचे प्रदूषण थांबल्यानंतर शहरातील नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाचे उद्दिष्ट साध्य होईल. त्यामुळे नदीकाठच्या गावांनाही चांगले पाणी मिळेल.

## दहिसर आणि मुलुंड करोना केंद्राप्रकरणी

## मुंबई पोलिसांकडून गुन्हा दाखल

### ३७ कोटींचा गैरव्यवहार झाल्याचा आरोप

**मुंबई :** दहिसर आणि मुलुंड येथे उभारण्यात आलेल्या करोना केंद्रांमध्ये झालेल्या कथित गैरव्यहाराप्रकरणी ताडदेव पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बनावट कागदपत्र व खोट्या माहितीच्या आधारे ३७ कोटी रुपयांचा गैरव्यवहार करण्यात आल्याचा आरोप असून याप्रकरणी कंत्राटदार ओक्स मॅनेजमेंट कन्सल्टन्सी प्रा. लि. चे राहुल गोम्स आणि महापालिकेच्या तत्कालीन अधिकाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली. याप्रकरणी मुंबई पोलिसांची आर्थिक गुन्हे शाखा तपास करणार आहे. दरम्यान, राहुल गोम्स हे ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांचे निकटवतीय असल्याचा आरोप भाजप नेते किरीट सोमय्या यांनी केला आहे.



आरोपींनी १ ऑक्टोबर २०२० ते १ ऑगस्ट २०२२ यादरम्यान कट रचून हा संपूर्ण गैरव्यवहार केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. आर्थिक गुन्हे शाखेच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक शिल्पा ठेंगे यांनी स्वतः याप्रकरणी तक्रार केली आहे. तक्रारीनुसार कंत्राटदार मे. ओक्स मॅनेजमेंट कन्सलटन्सी प्रा. लिमि.चे संचालक राहुल गोम्स यांनी दहिसर व मुलुंड येथील जम्बो करोना केंद्राची उभारणी केली. ते मुंबई महापालिकेला हस्तांतरित केल्यानंतर भाड्याच्या मागणीसाठी अप्रमाणिकपणे खोटी माहिती आणि देयके महापालिकेला सादर केली. मुंबई महापालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी कंत्राटदार व व्हेंडर्स यांच्यासोबत कट रचून हा संपूर्ण गैरव्यवहार घडवून आणला. अधिकाऱ्यांनी अधिकाराचा दुरूपयोग करून जाणीवपूर्वक खोटी देयके मंजूर केली. त्या बदल्यात कंत्राटदाराला ३७ कोटी रुपयांचा लाभ मिळाला. त्यामुळे सरकारचे नुकसान झाल्याचे तक्रारीत म्हटले आहे. याप्रकरणी कट रचणे, बनावट कागदपत्र तयार करणे, त्यांचा गैरवापर करणे, फसवणूक करणे अशा विविध कलमांतर्गत कंत्राटदार राहुल गोम्स व त्यांचे वेंडर्स, मुंबई महापालिकेचे तत्कालीन संबंधित अधिकारी यांच्याविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राहुल गोम्स यांना मिळालेल्या कंत्राटाबाबतही सक्त वसुली संचलनायलाने (ईडी) पडताळणी केली होती. गोम्स यांच्या कंपनीने कोविड फील्ड रुग्णालयांमध्ये खाटा, पंखे, तंबू आणि इतर सुविधा पुरवल्या होत्या. त्याबाबत गैरव्यवहार झाल्याची माहिती ईडीला मिळाल्यानंतर त्यांनी याबाबतचे पुरावे मुंबई पोलिसांना दिले होते. त्या पुरव्यांच्या आधारवर आर्थिक गुन्हे शाखेने याप्रकरणी प्राथमिक चौकशीला सुरूवात केली होती. त्यानंतर त्यांनी बुधवारी रात्री याप्रकरणी गुन्हा दाखल केला.

# परदेशी शिक्षणाची ओढ

गेली अनेक वर्षे ह्यब्रेन ड्रेनह्णची चर्चा होते आहे. परदेशात जाऊन शिक्षण घेण्याची आणि तिथेच स्थायिक होण्याची भारतीय विद्यार्थ्यांना एवढी आस का आहे? मागील आठवड्यात आलेला डंकी हा सिनेमा आणि त्यानंतर दुबईतून अवैध मार्गाने अमेरिकेला जाणारे आणि फ्रान्समध्ये अडकलेले अवैध भारतीय स्थलांतरित या दोन वेगवेगळ्या, पण एकमेकांत गुंतलेल्या घटनांमुळे अवैध स्थलांतर हा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. डंकी सिनेमामध्ये दाखवल्याप्रमाणे एखाद्या देशात वैधरीत्या स्थलांतरित होण्याचा सोपा मार्ग म्हणजे त्या देशात शिक्षणासाठी जाणे आणि पुढे तेथेच नोकरी करणे. इतर वैध-अवैध मार्ग आहेत, पण परदेशी शिक्षण हा मार्ग तुलनेने सरळ आहे.

२०२२ मध्ये अंदाजे १८ लाख भारतीय विद्यार्थ्यांनी परदेशी विद्यापीठात शिक्षण घेण्यासाठी देश सोडला. यामध्ये सर्वाधिक पसंती अमेरिकेला असून, त्यानंतर इंग्लंड, कॅनडा, ऑस्ट्रेलिया या इंग्रजी भाषिक देशांचा क्रम लागतो, तर जमनी, फ्रान्स, नेदरलँड, रशिया अशा इतर भाषीय देशांतसुद्धा लाखो विद्यार्थी शिक्षणासाठी जात आहेत. भारतीयांचा विचार केला, तर गुजरात, पंजाब, आंध्र प्रदेश, तमिळनाडू या राज्यांतील विद्यार्थी परदेशी शिक्षणाला प्राधान्य देतात. गुजराती आणि दक्षिण भारतीय विद्यार्थी अमेरिकेला प्राधान्य देतात, तर पंजाबी विद्यार्थी कॅनडाला. मराठी मुलांचा टक्का यामध्ये कमी असला तरी, गेल्या पाच वर्षांत तो वाढत चालला आहे.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या माहितीनुसार, परदेशी शिक्षणासाठी जाणाऱ्या मुलांकडून मोठ्या प्रमाणात शैक्षणिक कर्जाची मागणी होत असून, तो आकडा काही वर्षांपूवी एक लाख कोटींवर गेला आहे. ब्रिटिश सरकारच्या आकडेवारीनुसार, सन २०२२ मध्ये सुमारे एक लाख २५ हजार भारतीय विद्यार्थी ब्रिटिश विद्यापीठांत शिक्षणासाठी आले आहेत. एका वर्षात एक विद्यार्थी कमीत कमी ३० आणि जास्तीत जास्त ५० लाखांपर्यंत या देशांमध्ये फीसाठीचा आणि राहण्यासाठीचा खर्च करतो. पूर्वी फक्त एक वर्षाची पदव्युत्तर पदवी मिळवण्यासाठी विद्यार्थी जायचे, पण कोविडनंतर तीन ते चार वर्षांची पदवी मिळवण्यासाठीही विद्यार्थी या देशांत जायला लागले आहेत.

परदेशी शिक्षणासाठी जाण्यामध्ये सरकारी संस्थांमधील विद्यार्थी अग्रेसर आहेत. यामध्ये आयआयटीमधील पदवीधर सर्वांत पुढे आहेत. त्यानंतर दक्षिण भारतातील खासगी आणि अभिमत विद्यापीठातील विद्यार्थ्यांचा क्रमांक लागतो. याउलट गुजरात आणि पंजाबमधून छोट्या कॉलेजमधील विद्यार्थीही परदेशी शिक्षणासाठी पर्यटन करताना दिसून येतात. सर्वांत जास्त इंजिनीअरिंग, त्यानंतर बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशनचे उच्च शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थी परदेशी विद्यापीठांना पसंती देतात.

परदेशी विद्यापीठांतील पदवीला भारतात असलेल्या ग्लॅमरमुळे हे विद्यार्थी परदेशी जातात. हे त्यामागचे सर्वाधिक महत्त्वाचे कारण आहे. फक्त एक वर्षाची पदव्युत्तर पदवी घेतल्यानंतरही नोकरीच्या असणाऱ्या संधी हे दुसरे महत्त्वाचे कारण, परदेशातील सरळ-सुरळीत आयुष्याचे स्वप्न, कामाच्या ठिकाणी असणारे वातावरण आणि त्याबद्दल इतरांकडून ऐकलेले किस्से यामुळे तरुण वयातच परदेशी शिक्षणाला जाण्याचे प्रमाण वाढत आहे. नावाजलेल्या परदेशी विद्यापीठांत असणारी शिक्षणाची गुणवत्ता, विद्यापीठांमधील संशोधनाचे वातावरण, उच्च गुणवत्तेच्या तरुण आणि वयस्क प्राध्यापकांचा योग्य मेळ यामुळे ही विद्यापीठे तरुणांना खुणावतात. अनेक परदेशी विद्यापीठांमध्ये उद्योग आणि नोकरीसाठी लागणारे कौशल्याधारित शिक्षण, उच्च प्रतीच्या प्रयोगशाळा, संशोधनात रुची असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी निर्माण केलेल्या संधी, यांमुळे ही विद्यापीठे आपल्या पारंपरिक सरकारी आणि खासगी विद्यापीठांपेक्षा सरस ठरतात. फक्त हुशार मुलेच परदेशी शिक्षणासाठी जातात असे नाही. धनदांडगे पालक आपल्या कमी गुणवत्ता असलेल्या मुलांनासुद्धा कमी दर्जाच्याच परदेशी विद्यापीठांत पाठवतात. उदाहरण द्यायचे, तर इंग्लंडमधील ऑक्स्फर्ड शहरात ऑक्स्फर्डच्या नावाने दोन विद्यापीठे आहेत. एक हजार वर्षांपूवीचे मूळ ऑक्स्फर्ड विद्यापीठ, जिथे प्रवेश मिळवण्यासाठी जगभरातून हजारो मुले प्रयत्न करतात. तर याच शहरात ऑक्स्फर्ड ब्रुक नावाचे दुसरे एक विद्यापीठ आहे जिथे कमी गुणवत्तेच्या मुलांना सहजच प्रवेश मिळतो आणि त्या विद्यापीठाच्या डिग्रीवर नोकरीही मिळत नाही. तरीसुद्धा श्रीमंत भारतीय आणि चिनी मुलांचा भरणा या विद्यापीठांत असतो, कारण त्यांच्या डिग्रीवर ऑक्स्फर्ड नाव येते म्हणून. अशी अनेक विद्यापीठे अमेरिका, कॅनडा, जमनीमध्येसुद्धा आहेत.

तसेच परदेशात डिग्री घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला नोकरी मिळतेच असे नाही. अनेक जण कंटाळून माघारी येतात. कित्येक जण डंकी सिनेमासारखे फसवलेही जातात. भारतात असताना परदेशी विद्यापीठांबद्दल आणि एकंदरीतच तिथल्या परिस्थितीबद्दल जी स्वप्ने दाखवलेली असतात, तेवढ्या दर्जाची परिस्थिती नसेल ते पाहून अनेकांचा भ्रमनिरास होतो. ती मुले माघारी येतात. पण एकंदरीत शिक्षण घेऊन परदेशातच स्थायिक व्हायचे किंवा पुढची काही वर्षे नोकरी करायची हे किमान ९० टक्के मुलांचे स्वप्न असते. जागतिक परिस्थितीचा विचार केला, तर चीनमधून सर्वांत जास्त विद्यार्थी शिक्षणासाठी युरोप-अमेरिकेत येतात. त्यानंतर भारतीय, अरब देशांतील मुले आणि सर्वांत शेवटी श्रीमंत आफ्रिकी मुले. जपान, कोरिया या देशांतील मुलांचे प्रमाण खूप कमी असते. अनेक वर्षांपासून भारतात ह्यब्रेन ड्रेनह्ण म्हणजेच चांगल्या जीवन पद्धतीसाठी सुशिक्षित लोकांचे स्थलांतर यावर चर्चा होत आहेत. पण समजा ह्यब्रेन ड्रेनह्णमुळे भारतीय विद्यार्थ्यांनी परदेशी शिक्षणासाठी जायचे थांबवले, तर ती जागा इतर देशांतील विद्यार्थी भरून काढतील. चीन, व्हिएतनाम, फिलिपाइन्स, श्रीलंका, पाकिस्तान या आशियाई देशांबरोबरच घाना, दक्षिण आफ्रिका, नायजेरिया, इथिओपिया, अल्जेरिया या देशांतील विद्यार्थी भारतीयांच्या जागा मिळवतील. आफ्रिकेपेक्षा भारतात उच्च दर्जाचे शिक्षण असूनसुद्धा इंग्लंड-जमनी-अमेरिकेमध्ये आफ्रिकेतील विद्यार्थ्याने एक वर्षाची डिग्री घेतली, तरी या देशातील कंपन्या नोकरी देताना आफ्रिकी मुलांनाच प्राधान्य देतील. कारण त्या देशातील डिग्री घेतल्यानंतर व्हिसा, वर्क परमिट अशा अनेक गुंतागुंतीच्या प्रक्रियांतून या मुलांना सवलत मिळते आणि कंपन्यांना तेच हवे असते. त्यामुळे हळूहळू या देशांतील नोकरीमधील भारतीयांचा टक्का कमी होत जाईल. त्यामुळे एवढ्या सहजासहजी परदेशी शिक्षणाला जाण्याचा ओढा कमी होईल असे होणार नाही; उलट दर वषी यामध्ये किमान ३० ते ४० टक्के वाढ होताना दिसून येत आहे.

**भागा वरखडे**

भारतातच जागतिक दर्जाची विद्यापीठे उभी राहिली, तर हे प्रमाण लगेचच कमी होणार नाही. दिल्लीजवळ २०१४ मध्ये स्थापन झालेल्या अशोका विद्यापीठाने हा प्रयोग करून पाहिला आहे, पण तोसुद्धा फार यशस्वी होताना दिसून येत नाही. चांगल्या प्रयोगशाळा, जगातील अनेक भारतीयांना प्राध्यापक म्हणून संधी, तसेच महागडी फी यामुळे हे विद्यापीठ काही प्रमाणात वेगळे वाटते; पण जागतिक विद्यापीठांसारखी वातावरणनिर्मिती करण्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळे अनेक विद्यार्थी येथील डिग्री घेऊन पुन्हा परदेशी विद्यापीठांची वाट धरत आहेत, पण भारतामध्ये असे प्रयोग व्हायला लागलेत हेसुद्धा प्रशंसनीय आहे. पुढील काही वर्षांत याच धतीवर अनेक खासगी विद्यापीठे उभी राहतील यात शंका नाही. त्याच जोडीला येऊ घातलेल्या काही परदेशी विद्यापीठांमुळे भारतीय विद्यापीठांत आमूलाग्र बदल होईल, शैक्षणिक वातावरण अधिक स्पर्धात्मक होईल; पण यामुळे परदेशी शिक्षणाला जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्यात फरक पडेलच असे नाही.


# घरात एखादी मुलगी असती तर ...

**(भाग २)** आई, वासंती काकूंचा फोन होता. ती आज आपल्याकडे राहायला येणार आहे . ₹₹एकटीच येणार आहे का आई वासंती काकूंचा फोन होता. ती आपल्याकडे राहायला येणार आहे. एकटीच येणार आहे का ₹₹हो अग देवदत्त काका गुजरातला गेला आहे आणि आबा ट्रीपला गेलेत आणि सारंग शर्मिष्ठा? ते दोघे चेन्नईला आहेत ना आबासाहेब म्हणजे जयदेवचे काका . याच शहरात राहायचे. जयदेव -वासंतीमुलगा सून , सारंग - शर्मिष्ठा नातू-नातसून . असे सगळे जण नेहमी वसूकडे येऊन जाऊन असायचे. संध्याकाळची गोष्ट . वसूने रमाला दोन दागिने दिले होते. त्यापैकी नथ रमाने परत आणून दिली नव्हती . त्याची सुमतीबाई चोकशी करतात .वसू त्या रमाने नथ दिली का ग? नाही दिली अगं ती नथ खूप महत्त्वाची आणि मौल्यवान आहे. काही कळते का तुला ?गेल्या कित्येक पिढ्यापासून आपले हे दागिने आहेत. सापडेल हो नथ, त्यात काय एवढे? तुला काही कळत नाही. खरतर हे दागिने आपण कधीच नाही वापरले. चांगले नाही ते दागिने असे आमच्या सासूबाई म्हणायच्या. आणि तू त्या रमाला देऊन टाकलेस चांगले नाहीत ते म्हणजे काय?, तुम्ही विचारले नाही का? मी माज़्या सासूबाईंना जास्त प्रश्न विचारात नव्हते. त्यांना ते आवडत नसायचे. तू मला जरा जास्तच प्रश्न विचारतेस. ₹जहागीरदारच्या घरात फार पूवीपासून वापरात असलेला दागिन्यांचा एक डबा होता . त्यात वेगवेगळ्या प्रकारच्या दागिने होते.त्यापैकी नथ आणि ठुशी वसूने रमाला दिली होती. रमाने ठुशी परत केली होती पण नथ सापडत नव्हती. त्यामुळे सुमतीबाई चिडल्या.त्यांचा आधीच रमा वर राग . मध्यरात्रीच्या सुमारास 'वसु काकू ' अशी रमाची मोठी हाक आली . जयदेवने दरवाजा उघडला . त्याबरोबर सगळेच बाहेर आले . ₹देसाईच्या मुलींना वेळ नाही काळ नाही. सतत आमच्या राशीला. सुखाने झोपून सुद्धा देणार नाहीत सुमतीबाई बडबडत बाहेर येतात.

ही तुमची नथ घ्या रमा अगंबाई सापडली वाटते. तरी मी म्हणत होते नथ सापडेल म्हणून वासंती कुठे सापडली ग वसू

साडीच्या काठात अडकली होती. गुडनाईट. झोपा आता शांतपणे. रमा निघून जाते. म्हणे शांतपणे झोपा. एवढा आरडाओरडा केल्यांनतर झोप येईल का शांतपणे? सुमतीबाई आता पुरे ना आभाळ गच्च भरून आले होते. सोसाट्याचा वारा आला होता,. पावसाचे टपोरे थेंब पडू लागले होते. वसू आणि वासंती दोघीजणी झोपाळ्यावर बसून गप्पा मारत होत्या .घरात त्या दोघीजणींचं होत्या. आपल्या घरात एक मुलगी असावी असे मला नेहमी वाटते शर्मिष्ठा आहे की मग शर्मिष्ठा सून आहे अग पण ती आपल्याला मुली सारखीच आहे ना, मागे सारंगच्या लग्नात तूच म्हणाली होती ना शर्मिष्ठाच्या रूपाने आपल्या घरात मुलगी आली म्हणून. हो पण एक मुलगी असावी आपल्याच घराची. जन्मापासून आपले नाव लावणारी . बघ ना आपल्या घरात सगळे मुलगेच आहेत.एखादी तरी मुलगी असावी. आपल्या शेजारीच बघ ना सख्ख्या चुलत मिळून पाच मुली आहेत. किती छान वाटते मुली असल्या कि घरात एक वेगळेच चैतन्य असते.

माझ्या मनात तिचे चित्र अगदी स्पष्ट आहे. फारशी गोरी नाही पण सावळी असावी . लांबसडक केस असावेत . मी तिच्या केसांची रोज वेणी घालेन . कधी बटवेणी तर कधी सागर वेणी घालेन. त्यावर गाजरे घालेन. तिने झोक्यावर बसून झोके घ्यावेत . तिच्या पायात पैंजण असतील . तिच्या मैत्रिणी घरी याव्यात . त्यांच्या हसण्याने घर भरून जावे. मग मुलीच्या लग्नाची गडबड. रुखवताची तयारी . पाठवणीच्या वेळी रडणे. ह्या सगळ्या गोष्टी मला' अनुभवायाच्या आहेत ग. गेले दोन तीन दिवस सुमती बाई थोड्या काळजीत होत्या . याला कारण म्हणजे रात्री स्वप्नात त्यांच्या सासुबाई यायच्या आणि म्हणायच्या कि सुमती तू काहीतरी विसरली आहेस , तुज़्या सुनांना सांगायचे. आठव नाहीतर अनर्थ घडेल. लक्षात ठेव. तुझे लग्न झाल्यावर मी तुला सांगितले होते , पण तू मात्र हे पुढच्या पिढीला सांगायचे विसरली आहेस . आपल्या घराबद्दल हि खूप महत्त्वाची गोष्ट आहे . आठव सुमती या स्वप्ना नंतर सुमतीबाई रात्रभर जाग्या होत्या. त्यांना काही कळत नव्हते की प्रकार सुरु आहे ते सकाळची सगळी कामे झाल्यानंतर वसू दिवाणखान्यात एकटीच बसली होती. सकाळी साडेपाच पासून



तिची कामे सुरु असायची.आज मात्र दमली होती. असे वाटत होते कि कुणीतरी एक ग्लास पाणी द्यावे. पण कुणीच नव्हते घरात. सगळे आपापल्या कामाला गेले होते.

' पाणी ' एक अनोळखी मुलगी वसूला आणून देते. उंच ,सावळी , लांब मोकळे केस सोडले होते . ₹तुला कसे कळले मला पाणी हवेय ते मला सगळे कळते.

पण तू कोण आहेस? 'मी मुलगी आहे तसे नव्हे, म्हणजे शेजारी वतर्काकडे भाडेकरू म्हणून रहायला आली आहेस का?नाही. मी इथेच राहते

इथंच म्हणजे कुठे राहतेस? देसायाकडे पाहुणी म्हणून आली आहे का तू ? नाही. मी इथंच राहते म्हणजे नक्की कुठे? आता मात्र वसूला काही कळेना.

याच वाड्यात बरे. नाव काय तुझे? मला नाव नाही. माझे बारसेच झाले नाही पण मग घरातले तुला कोणत्या नावाने हाक मारतात? मला आजपर्यंत कधी कुणी हाकच मारली नाही पण माज़्या वडिलांनी माझे नाव ठरवले होते काय ठरवले होते? मधुमती अग किती छान नाव आहे तुझे. मला मधुमती नाव खुप आवडते. मी आता तुला यायचं नावाने हाक मारेन. चालेल ना तुला? हो मी तुझ्या केसांची वेणी घालते. ये इकडे बस . त्यानंतर दिवसभर मधुमती जहागीरदाराकडे होती . संध्याकाळी जयदेव आणि वसू गप्पा मारत होते . वसू, सकाळी एक मुलगी आपल्या बागेतली फुले तोडत होती. म्हटले वसूने पाहिले तर झाले कल्याण सकाळी आली ती मुलगी. पण कोड्यातच बोलत होती लहान आहे ती अरे तिचे नाव काय आहे माहिती आहे का? काय ओळख ना?

....(क्रमशः)

**पुणे वैंभव सौ. प्राजक्ता प्रणव देव**
**पिरंगुट , पुणे.मो.- ८७६६५८३९२**

# संप सुटला, समस्येचं काय?

भारतीय न्याय संहितेतील वाहतुकीसंदर्भातल्या तरतुदींना विरोध करण्यासाठी ट्रक आणि टँकरचालकांनी सुरू केलेल्या संपाची धार कमी झाली असली तरी, मुळात कठोर कायदे करून हा प्रश्न सुटणार आहे का? की त्यावर आणखी उपाय शोधावे लागतील? ते कोणते?

ट्रकचालकांचा संप सुरू झाला आणि नव्या हिट अँड रन तरतुदींची चर्चा सुरू झाली. ट्रकचालकांच्या या संपामुळे लोकांच्या मनात अर्थातच त्यांच्याविरोधात असंतोष उसळला. याबाबत माझा अभ्यास काही वेगळंच सांगतो. विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात रस्ते अपघातांचा मुद्दा मांडताना मी काही आकडेवारीही दिली होती. २०१६ पासून २०२२ पर्यंत या आकडेवारीत सातत्याने वाढ झाली आहे. २०२२ मध्ये राज्यातील ३३ हजारांपेक्षा जास्त अपघातांमध्ये १५ हजारांपेक्षा जास्त लोकांचा मृत्यू झाला. देशपातळीवर हा आकडा आणखी प्रचंड आहे. विधान परिषदेतल्या भाषणात मी मांडलेला एक मुद्दा होता पोलिसांसह आरटीओच्या कार्यपद्धतीचा!

परवा नाशिकहून मुंबईला येताना ठाणे जिल्ह्याची हद्द जिथे सुरू होते, तिथला ठाणे ग्रामीण पोलिसांनी उभारलेला एक चेकनाका दिसला. महामार्गावरील वळणांवर, उतारांवर नियम तोडणाऱ्या वाहनचालकांवर कारवाईसाठी दडून बसलेल्या पोलीस व आरटीओ कर्मचाऱ्यांमुळे अपघात होतात. अद्याप या चेकनाक्यावर अपघात झालेला नाही किंवा झाला असला, तरी त्याला तशी प्रसिद्धी मिळाली नाही. पण समृद्धी महामार्गावर आरटीओमुळे झालेल्या अपघाताची घटना ताजी आहे. मग अशा घटना घडल्यावर त्याला तो वाहनचालक जबाबदार आहे, असं आपण ठोसपणे कसं म्हणणार? ती जबाबदारी वाहतूक पोलिसांची, आरटीओचीदेखील नाही का?

अर्थात रस्ते अपघातांसाठी पोलिसांचा अचानक हस्तक्षेप हे एकमेव कारण नाही. वाहतुकीचे नियम तोडणे, हे सर्वात महत्त्वाचं कारण असतं. त्यातही वाहनं वेगमर्यादेपेक्षा जास्त वेगाने चालवणं, मद्य किंवा अमली पदार्थाच्या अमलाखाली गाडी चालवणं, चुकीच्या बाजूने गाडी चालवणं, सिग्नल तोडणं किंवा मोबाइल फोनवर बोलत वाहन चालवणं हे काही नेहमी मोडले जाणारे नियम आहेत. त्यामुळे होणाऱ्या अपघातांची आणि त्यात मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्या सर्वाधिक आहे.

आपल्याकडे सिग्नल यंत्रणा बसवण्याचं काम त्या-त्या शहरातील स्थानिक स्वराज्य संस्था करते. पण ती यंत्रणा चालवण्याचं आणि देखरेखीचं काम वाहतूक पोलिसांकडे असतं. प्रगत देशांमध्ये इंटिग्रेटेड सिग्नल प्रणाली कधीच लागू झाली होती. आता त्या देशांनी ह्यएआयह्ण म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करत सिग्नल यंत्रणा अधिक सक्षमपणे राबवायला सुरुवात केली आहे. आपल्याकडे अजूनही पालिका आणि वाहतूक पोलीस यांच्यात एकवाक्यता नसल्याने असलेली सिग्नल यंत्रणा प्रभावीपणे काम करत नसल्याचं चित्र आहे.

वाहनचालकांविरोधात कठोर कायदे असू नयेत, असं माझं मत बिलकूल नाही. पण फक्त कठोर कायदे करून हा प्रश्न सुटणार नाही, असं मला वाटतं. हा गुंता सोडवण्यासाठी दीघर्कालीन उपाययोजना करणं गरजेचं आहे. यात सरकारबरोबरच जनसामान्यांनीही त्यांचा वाटा उचलणं गरजेचं आहे.

याबाबत इतर देशांमध्ये वाहन कायद्यांची काय परिस्थिती आहे, त्यावर एक नजर टाकू




या. अमेरिका, युरोप किंवा ऑस्ट्रेलिया अशा प्रगत देशांमध्ये मोटार चालवण्याचा परवाना मिळवण्याची प्रक्रिया क्लिष्ट असते. तिथेही १६ ते १८ या वयात लायसन्स देतात. पण त्यासाठी तिथल्या उमेदवारांना कठोर लेखी परीक्षा द्यावी लागते. त्याशिवाय मोटार वाहन कायद्यांमधील नियमांचा अभ्यास करावा लागतो. ही प्रक्रिया आपल्याकडेही आहे. पण त्या देशांमध्ये ती खूप काटेकोरपणे पाळली जाते.

साधं उदाहरण देतो. अमेरिकेत गेलो होतो, तेव्हा कॅलिफोर्नियातल्या एका छोटया गावात होतो. तिथे झेब्रा क्रॉसिंग सोडून इतर ठिकाणाहून कोणीच कधीच रस्ता ओलांडत नाही, ही गोष्ट मला माहीत होती. मी माज्या मुलीचा हात धरून फुटपाथवर थांबलो होतो. दोन-तीन गाडया येत होत्या. त्या गेल्या की, रस्ता ओलांडू, असा विचार करून मी उभा होतो. त्या दोन गाडया आल्या आणि झेब्रा क्रॉसिंगच्या आधी थांबल्या. वाहनचालकाने आतूनच मला रस्ता ओलांडण्याची खूण केली.

या देशांमध्ये पायी चालणाऱ्यांना प्रथम प्राधान्य असते. इथे पादचारीही झेब्रा क्रॉसिंगवरूनच रस्ता ओलांडतात. लाल सिग्नल असेल, तर निमूटपणे थांबतात. लहान लहान मुलं तर सोडा, मी त्या देशांमध्ये पाळीव कुत्रेही निमूटपणे सिग्नल हिरवा होण्याची वाट बघत थांबलेले बघितले आहेत.

हे शक्य होतं ते शाळेपासून वाहतुकीच्या नियमांचे धडे दिल्यामुळे! आपल्याकडेही मुंबईत वाहतूक पोलिसांनी ट्रॅफिक पार्क सुरू केलं होतं. शाळेच्या विद्यार्थ्यांना तिथे आणून त्यांना वाहतुकीच्या नियमांचे धडे देण्याचा उपक्रम होता. पण माज्या माहितीप्रमाणे हा उपक्रम फारसा यशस्वी झाला नाही.

आणखी महत्त्वाची गोष्ट म्हणजे या प्रगत देशांमध्ये लायसन्स मिळण्याची खडतर प्रक्रिया! जमनीत ड्रायव्हिंग लायसन्स काढण्यासाठी २५०० युरो फी आहे. ज्या देशात सरासरी मासिक मिळकत साडेचार हजार युरो एवढी आहे, तिथे लायसन्ससाठी एवढी फी भरायला लागणं, यावरूनच तिथं ड्रायव्हिंग किती गांभीर्याने घेतात, हे कळतं. तिथे ड्रायव्हिंगसह प्रथमोपचारांचं प्रशिक्षण आणि नेत्र तपासणीही केली जाते. त्यातही २५०० युरो भरले आणि लायसन्स मिळालं, एवढी सोपी प्रक्रिया नसते. सरकारमान्य ड्रायव्हिंग स्कूलमध्ये १०० तास सराव करावा लागतो. त्यानंतर चाचणी होते. त्यात अनुत्तीर्ण झालं, तर ही प्रक्रिया आणखी हजारभर युरो पुन्हा भरून करावी लागते. अमेरिकेत तर मुलाला किंवा मुलीला लायसन्स मिळालं, तर आईबाप सगळयांना पाटी देतात. यावरून तिथं लायसन्स मिळवणं किती कठीण आहे, याचा अंदाज येईल.

या तुलनेत आपल्याकडे ५०० रुपयांमध्ये पक्कं लायसन्स मिळतं. ते मिळवण्याचे सोपे मार्ग सगळयांनाच माहीत असतात. अनेकदा ते मिळवण्यासाठी प्रत्यक्ष जाण्याची गरज नसते. गेल्या काही वर्षांपासून लायसन्ससाठी लेखी परीक्षा घेतात, पण ती उत्तीर्ण करण्याचे मार्ग एजंट सहज काढून देतात. लायसन्स आहे, तो खरोखरच सुरक्षितपणे गाडी चालवण्यासाठी सक्षम आहे का, ही खरी मेख आहे.

दुसरा मुद्दा नियमांच्या कठोर अंमलबजावणीचा! मोटार वाहन अधिनियमनात बदल करत राज्य सरकारने नियमभंगांसाठीच्या दंडाच्या रकमेत भरघोस वाढ केली. पण वाहतूक पोलिसांनी पकडल्यानंतर संपूर्ण दंडाची रक्कम भरण्याऐवजी चिरीमिरी देत सुटण्याकडे अनेकांचा कल असतो. दुर्दैवाने काही वाहतूक पोलीस ती स्वीकारत काहींना सोडताततही. तसंच अनेकदा वाहतूक पोलिसांना महिन्याचं टार्गेट दिलं जातं असंही सांगितलं जातं. ते पूर्ण करण्यासाठी मग वाहतूक पोलीस एखाद्या वळणावर झाडामागे, उतारावर एखाद्या आडोशाला दडून संभावित बकऱ्यांची वाट पाहत त्यांना अचानक पकडतात. या पोलिसांना चुकवण्यासाठी गाडया जोरात पळवल्याने अचानक अपघात होण्याचं प्रमाणही खूप आहे. हा मुद्दा मी विधिमंडळातही मांडला होता.

तिसरा मुद्दा जनजागृतीचा! मी राज्यभरात खूप प्रवास करतो. अनेकदा महामार्गाने जाताना मध्येच कोणीतरी रस्ता ओलांडतं. अशा वेळी वाहनचालकाला गाडी थांबवणं शक्य नसतं. कधीकधी वाहनचालक भरधाव वेगाने गाडी चालवताना पादचाऱ्यांना, दुचाकीस्वारांना उडवण्याच्या घटनाही घडतात. अशा वेळी तो वाहनचालक थांबला आणि जमावाच्या तावडीत सापडला, तर त्याला अधर्मेलं होईपर्यंत मारहाण होते. त्यामुळे अनेक ट्रक-टँकर चालक घटनास्थळावरून पळून जातात. हे टाळण्यासाठी वाहतूक कायद्यांबाबत जनजागृती करण्याची गरज आहे.

ट्रक-टँकरचालकांचे पगार बेतास बात असतात. प्रगत देशांमधला ट्रकचालक उत्तम कमावतो. सात लाख रुपयांचा दंड भरणं ही गोष्ट आपल्या देशातील ट्रक-टँकरचालकांच्या आवाक्याबाहेरची गोष्ट आहे. दहा वर्षांचा कारावास ठोठावला, तर त्यांचं उर्वरित आयुष्य बरबाद होणार आहे. या कायद्यांच्या भीतीने तरुण वाहनचालक ट्रक-टँकर ड्रायव्हिंगच्या व्यवसायात येणार नाहीत. एका आकडेवारीनुसार आत्ताच देशात २७ लाख ट्रक ड्रायव्हरची कमतरता आहे. हे ट्रक वाहतूकदार आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहेत, हे लक्षात घेतले पाहिजे. त्यामुळे या समस्येवर तोडगा काढण्यासाठी झटपट उपाययोजनांऐवजी दीघर्कालीन तोडगा काढण्याकडे केंद्र सरकारने लक्ष दिलं पाहिजे. आपण महामार्गाचं जाळं उभारत असताना हे महामार्ग मृत्यूचे सापळे ठरू नयेत, याची काळजी घेणं, हेदेखील आपल्या सगळयांचंच कर्तव्य आहे, हे विसरून चालणार नाही.

मुख्य *संपादक : नरेश विठ्ठल देसाई हे दैनिक राजदंड मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा. लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११ / २ आणि १ / १३, वारजे पुणे - ४११ ०५८ येथे मुद्रित करून न्याती ग्रँडीयर, १०२ ग्रीनविच, कडनगर, उंड्री, पुणे -४११ ०६० येथून प्रकाशित केले. दैनिक राजदंडमधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. (*पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी) दूरध्वनी : पुणे (०२०)२६९०९०३१, इमेल-rajdand.pune@gmail.com
या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील.

# विकसित भारत संकल्प यात्रेचे वडगावात स्वागत



**वडगाव मावळ :** केंद्र शासनाच्या फ्लॅगशिप योजनांचे लाभ लक्षित लाभार्थ्यांपर्यंत पोहोचावेत या दृष्टीने वडगांव नगरपंचायत कार्यक्षेत्रात विकसित भारत संकल्प यात्रा गुरूवार दि ४ दाखल झाली. केंद्र शासनाच्या माहिती व प्रसारण विभागाद्वारे या संकल्प रथाची रचना करण्यात आली आहे. केंद्र शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा तळागाळातील लाभार्थ्यांना लाभ मिळावा व सर्वांना या योजनांची माहिती व्हावी हा या विकसित भारत संकल्प यात्रेचा मूळ हेतू आहे. या कार्यक्रमाचे नियोजन वडगाव नगरपंचायत प्रशासनामार्फत करण्यात आली होते. कार्यक्रमाचे उद्घाटन नगरपंचायतीचे प्रशासक तथा मुख्याधिकारी डॉ प्रविण निकम भाजपाचे प्रभारी भास्करराव म्हाळसकर यांनी केले.

या कार्यक्रमात वडगाव शहरातून ३०० लाभार्थी सहभागी झाले होते.असून वेगवेगळ्या योजनांबाबत त्यांनी माहिती घेतली, या कार्यक्रमासाठी तळेगाव दाभाडे शहरातून सुमारे 300 लाभार्थी सहभागी झाले असून वेगवेगळ्या योजनांबाबत त्यांनी माहिती घेतली. विकसित भारत संकल्प यात्रेचे विशेष आकर्षण हा संकल्प रथ असून विविध योजनांची माहिती देणारी छायाचित्रे व जनजागृती पर बॅनर पोस्टर्स या रथावर लावण्यात आलेले आहेत. वडगांव शहरामध्ये विकसित भारत संकल्प यात्रा रथ सकाळी 9 ते 1 या वेळेत श्रीमंत सरदार महादजी शिंदे उद्यान येथे दाखल झाला होता.यावेळी सर्व उपस्थितांनी आपला विकसित भारत शपथ घेतली, या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी नगरसेवक रवींद्र म्हाळसकर यांनी केले तसेच मुख्याधिकारी डॉ प्रविण निकम यांनी आभार मानले

वडगांव नगरपंचायत मार्फत पी. एम. स्वनिधी, स्वनिधी से समृद्धी, पी. एम. विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजना, बँकामार्फत विविध कर्ज योजना, पी. एम. उज्ज्वला योजना ,प्रधानमंत्री आवास योजना (नागरी), आयुष्मान भारत योजना, आरोग्य विभाग योजना, आधार अपडेट,प्रधानमंत्री सुरक्षा बिमा योजना, प्रधानमंत्री जीवन ज्योती बिमा योजना, अटल पेंशन योजना, प्रधानमंत्री मुद्रा योजना, महिला बचतगट व दिव्यांग बांधव यांची नोंदणी, स्वच्छ भारत अभियान इत्यादी नागरी भागातील योजनांची माहिती यावेळी नागरिक व लाभार्थी यांना देण्यात आली.

यावेळी माजी सभापती गुलाबराव म्हाळसकर शहराध्यक्ष अनंता कुडे नगरसेवक किरण म्हाळसकर माजी उपनगराध्यक्ष अर्चना म्हाळसकर नारायण ढोरे सोमनाथ काळे भुषण मुथा संभाजी म्हाळसकर शहरातील लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, माजी उपनगराध्यक्ष, माजी नगरसेवक, बचत गट, बँक प्रतिनिधी, नागरिक, योजनांचे लाभार्थी, नगरपंचायत अधिकारी, कमर्चारी उपस्थित होते.

## वरिष्ठ डॉक्टरने केली निवासी डॉक्टरला मारहाण

**ठाणे :** महापालिकेच्या कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात एका वरिष्ठ डॉक्टरने निवासी डॉक्टरला शिवीगाळ करत मारहाण केल्याचा प्रकार शुक्रवारी उघडकीस आला आहे. रुग्ण दाखल न करून घेण्यावरून हा वाद झाल्याचे समजते. या प्रकरणी मारहाण करणाऱ्या डॉक्टरवर कारवाईची मागणी निवासी डॉक्टरांनी केली आहे. दरम्यान या घटनेचा अहवाल मागविण्यात आला असून तो आल्यावर तात्काळ कारवाई करण्यात येईल, असे पालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

ठाणे महापालिकेचे कळवा येथे छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय असून त्याला संलग्न राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालय आहे. या महाविद्यालयात पदवी पूर्ण करणारे विद्यार्थी एक वर्षाच्या करारावर कळवा रुग्णालयात निवासी डॉक्टर म्हणून काम करतात.

# भव्य रथयात्रा व बाईक रॅलीने शंभराव्या नाट्य संमेलनाच्या शुभारंभ सोहळयाचा प्रारंभ

**पुणे :** पारंपारिक वेशभूषा केलेले पुरुष, नऊवारीत नटलेल्या महिला, सर्वांच्या डोक्यावर आकर्षक फेटे आणि मराठी रंगभूमीवरील अजरामर अशा १०० कलाकृती मधील महत्त्वपूर्ण व्यक्तिरेखा यांनी शुक्रवारी सकाळी पुणेकरांचे लक्ष वेधून घेतले. निमित्त होतं शंभराव्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाच्या शुभारंभ सोहळ्या निमित्त काढण्यात आलेल्या भव्य रथयात्रा आणि बाईक रॅलीचे.

शंभराव्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनानिमित्त पुण्यनगरीचा मानबिंदू असलेल्या बालगंधर्व रंगमंदिरापासून ते गणेश कला क्रीडा मंचापर्यंत ढोल ताशांच्या गजरात वाजत गाजत निघालेल्या या भव्य शोभायात्रेत



३०० दुचाकी, १० रथावर विराजमान झालेले ज्येष्ठ कलाकार आणि १०० विविध नाटकांमधून रसिकांच्या पसंतीस उतरलेल्या १०० व्यक्तिरेखांचा समावेश होता.

या प्रसंगी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद अध्यक्ष ज्येष्ठ अभिनेते प्रशांत दामले, नाटय परिषद पुणे शाखेचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले, पुणे शाखेचे विजय पटवर्धन, रजनी भट,जयमाला इनामदार,दीपक रेगे,माधव अभ्यंकर,सुनील गोडबोले, गिरीश ओक,शोभा कुलकणी,अभिजित बिचुकले यांच्यासह पुण्यातील कलावंत, नाटय परिषदेचे पदाधिकारी आणि कायर्कारिणी सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, ही रथयात्रा आणि बाईक रॅली गणेश कला क्रीडा रंगमंच येथे पोहचली, त्यानंतर मान्यवरांच्या उपस्थितीत रंगमंच पूजन तसेच प्रशांत दामले यांच्या हस्ते तिसरी घंटा देऊन आज (शुक्रवार) होणाऱ्या कार्यक्रमांचा शुभारंभ करण्यात आला.

## टीएमसी नेत्याच्या घरावर छापा टाकण्यासाठी गेलेल्या ईडीच्या पथकावर हल्ला

पश्चिम बंगालमधील टीएमसी नेते शाहजहान शेख यांच्या घरावर छापा टाकण्यासाठी गेलेल्या ईडीच्या पथकावर समथर्कांकडून हल्ला करण्यात आला आहे. रेशन घोटाळ्याप्रकरणी तृणमूल काँग्रेसचे नेते शाहजहान शेख यांच्या घरावर छापा टाकण्यासाठी बंगालच्या उत्तर 24 परगणा येथे अंमलबजावणी संचालनालय आणि केंद्रीय सुरक्षा दलाच्या पथकावर शेकडो जमावाने हल्ला केला. या हल्ल्यात मीडियाच्या वाहनांचेही नुकसान झाले. ज्यात पत्रकार आणि कॅमेरापरसन जखमी झाले आहेत.

टीएमसी नेते शाहजहान शेख यांच्या शेकडो समथर्कांनी ईडी आणि निमलष्करी दलाच्या पथकावर हल्ला केल्याचा आरोप आहे. हल्ल्यादरम्यान घटनास्थळी उपस्थित असलेल्या अनेक माध्यमांच्या वाहनांचीही तोडफोड करण्यात आली. न्यूज 18 बांगलाच्या वार्ताहरालाही मारहाण करण्यात आली, त्यांच्या कारची तोडफोड करण्यात आली आणि कॅमेरा तोडण्यात आला. टीएमटी नेते शेख यांच्या समथर्कांनी ईडी अधिकाऱ्यांवर हल्ला केला, त्यामुळे छापा टाकता आला नाही.

विरोधी पक्षनेते सुवेंदू अधिकारी यांनी सोशल मीडिया साइट वर सांगितले की, पश्चिम बंगालमधील कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती खराब आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेऊन ही अराजकता मोडून काढण्यासाठी योग्य ती कारवाई करावी, अशी विनंती त्यांनी केंद्रीय गृहमंत्री आणि इतर संबंधित अधिकाऱ्यांना केली. एवढेच नाही तर या हल्ल्यात रोहिंग्यांचा हात असू शकतो असा आरोपही त्यांनी केला.

# चंदुकाका सराफ ज्वेलर्सच्या वतीने वाईमध्ये सोन्याच्या व हिऱ्याच्या दागिन्यांचे भव्य प्रदर्शन व विक्रीचा शुभारंभ



**प्रदर्शनीचा शुभारंभ करताना आमदार श्री. मकरंद पाटील शेजारी श्री. महादेव मस्कर, श्री. अनिल सावंत, रोहिणी दिक्षीत, दिपकजी ओसवाल, अनुराधा कोल्हापुरे, श्री. दिलीप पिसाळ, श्री. रूपेश शर्मा, रूपाली कदम व अन्य.**

**वाई :** गेली 1९७ वर्षे शुध्दता, परंपरा आणि विश्वास या त्रिसुत्रीच्या भक्कम पायावर उभ्या राहिलेल्या व निरंतर प्रगती करत प्रत्येकग्राहकांच्या मनात विश्वास निर्माण करणारे नांव म्हणजे चंदुकाका सराफ ज्वेल्स. चंदुकाका सराफ ज्वेल्स्ने शुध्द सोने ही संकल्पना घराघरात पोहचवली व यामुळेच संपुर्ण महाराष्ट्रभर कायर्भार संपादित केलेल्या चंदुकाका सराफ ज्वेल्स यांनी सोन्याच्या व हिर्यांच्या दागिन्यांचे भव्य प्रदर्शन वाई परिसरातील ग्राहकांच्या सोयीकरीता उत्तमोत्तम आणि कलात्मक दागिन्यांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे.

या प्रदर्शनीचा शुभारंभ वाई-खंडाळा विधानसभा मतदार संघाचे आमदार मा. मकरंद पाटील यांचे हस्ते व जिल्हा परिषद सदस्य महादेव मस्कर, वाईचे माजी नगराध्यक्ष अनिल सावंत, सुर्योदय संस्थेच्या अध्यक्षा रोहिणी दिक्षीत, नगरसेवक दिपकजी ओसवाल, उत्कर्ष पतसंस्थेच्या चेअरमन अनुराधा कोल्हापुरे, किसनवीर साखर कारखान्याचे संचालक दिलीप पिसाळ व चंदुकाका सराफ ज्वेल्स चे क्लस्टर हेड रूपेश शर्मा, सातारा ब्रँच मॅनेजर रूपाली कदम अन्य मान्यवर यांच्या उपसथितीत संपन्न झाला.

सोने व हिर्यांच्या लक्षवेधी दागिन्यांचे भव्य प्रदर्शन व विक्री वाई येथे दि. ५ ते ८ जानेवारी २०२४ या कालावधीत साठे मंगल कार्यालय, किसनवीर चौक, गणपती आळी, वाई येथे स. 10 ते रा 8 या वेळेत सुरू रहाणार आहे. सदर प्रदर्शनीला वाईकरांनी पहिल्या दिवसापासूनच उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. या प्रदर्शनीचे वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये सोने व हिर्यांचे नवनवीन डिझाईन्स्चे असंख्य दागिने वाईकरांना उपलब्ध करण्यात आले आहे. त्यामुळे वाईकरांनी आपले आवडते दागिने घेण्यासाठी या प्रदर्शनीला आवर्जून भेट द्यावी, असे आवाहन चंदुकाका सराफ ज्वेल्स चे संचालक सिध्दार्थ शहा यांच्यातर्फे करण्यात आले आहे.

### माजी नगरसेवक मारुती आबा तुपे यांनी केले वाढदिवसानिमित्त

## अटल बिहारी वाजपेयी व गोपीनाथ मुंडे यांच्या जयंतीनिमित्त पंधरवडा सेवेचे आयोजन

**हडपसर :** भारतरत्न माजी पंतप्रधान स्व.अटल बिहारी वाजपेयी यांच्या वाढदिवसानिमित्त व लोकनेते मा.केंद्रीय मंत्री स्व.गोपीनाथ मुंडे, भाजपाचे माजी नगरसेवक मारुती आबा तुपे यांच्या वाढदिवसानिमित्त पंधरा दिवस सेवा आठवडा म्हणून साजरा करण्यात येत आहे.

समाजसेवा करत असताना आपले समाजाप्रती असणाऱ्या दायित्वाची जाण असलेल्या मारुती तुपे यांच्या संकल्पनेतून जीवनावश्यक गरजांपासून वंचित असलेल्या समाजातील विविध घटकांना आपण मदत केली पाहिजे यासाठी शालेय विद्यार्थ्यांना दप्तर वाटप, तसेच गरजू व्यक्तींना थंडीपासून संरक्षण करण्यासाठी ब्लँकेट वाटप, मतिमंद विद्यालयात विद्यार्थ्यांना खाऊ वाटप, पुणे मनपाच्या शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप, वृद्धाश्रमात महिलांना वृद्धांना कपड्यांचे वाटप, गोशाळे मध्ये जनावरांना चाऱ्याचे वाटप, वृक्षारोपण, किराणा वाटप, व 25 डिसेंबर रोजी गांधी चौक हडपसर या ठिकाणी भव्य रक्तदान शिबिर, नेत्रचिकित्सा शिबिर व आरोग्य तपासणी शिबिर असे विविध उपक्रम आयोजित करण्यात आले होते.

नागरिकांनी स्वयंस्पृतिने रक्तदान शिबिरात मोठ्या संख्येने सहभाग घेतला, देसाई आय हॉस्पिटलच्या माध्यमातून नागरिकांचे नेत्र तपासणी करून गरजूंना मोफत चष्मे वाटप करण्यात आले तसेच पुणे ब्लड बँकेच्या माध्यमातून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सेवा सप्ताह पंधरवड्याचे आयोजन भारतीय जनता पाटी हडपसर विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी कार्यकर्ते तसेच धमवीर शंभूराजे प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष माजी नगरसेवक मारुती आबा तुपे युवा प्रतिष्ठानच्या माध्यमातून करण्यात आले होते.

# वडगाव नगरपंचायत हद्दीत चुकीच्या बांधकाम नोंदी; करांमध्ये भरमसाठ वाढ

## वाढीव कर मूल्यांकनाबाबत पुनर्विचार करा!

### वडगाव शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने नगरपंचायत प्रशासनाला निवेदन



**वडगाव मावळ /सतिश गाडे**

वडगाव नगरपंचायत प्रशासनाने नवीन पाच वर्षातील आर्थिक वर्ष २०२३-२४ करिता मालमत्ता करामध्ये भरमसाठ वाढ केली आहे या कर मूल्यांकनबाबत पुनर्विचार करावा अशी मागणी वडगाव शहर राष्ट्रवादी काँग्रेसने केली आहे याबाबत वडगाव नगरपंचायतीचे प्रशासक तथा मुख्याधिकारी डॉ प्रविण निकम यांना निवेदन देण्यात आले आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पुणे जिल्हाध्यक्ष ओबीसी विभाग अतुल राऊत, मावळ विधानसभा युवक अध्यक्ष विशाल वहिले, मावळ विधानसभा सहकार सेल अध्यक्ष सुधाकर वाघमारे, मा. ग्रा. पं. सदस्य बारकूनाना ढोरे, नितीन भांबळ, पंकज भामरे, राहील तांबोळी आदी उपस्थित होते. वडगाव नगरपंचायत प्रशासनाने अधिकचे कराची नोंद करून घरमालकांना कराच्या नोटिसा पाठविण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये चुकीच्या बांधकामाची मोजणी बांधकाम संबंधित लावलेले चुकीचे निष्कर्ष,करांमध्ये केलेली भरमसाठ वाढ दिसून येत आहे जवळपास ६०० हून अधिक घरमालकांनी यावर लेखी आक्षेप सादर केलेले आहेत. ५ डिसेंबर २०२३ रोजीच्या केलेल्या प्रत्यक्ष सुनावणी मध्ये करा संबंधाने अनेकांनी तीव्र नाराजी व्यक्त केलेली आहे प्रत्यक्ष झालेल्या सुनावणीमध्ये प्रत्यक्ष पाहणी तपासणी केल्यानंतर आवश्यक ते बदल करण्यात येतील असे लेखी आदेश आक्षेपावर देण्यात आलेले आहेत परंतु अद्यापही बऱ्याच ठिकाणी प्रत्यक्षात पाहणी केलेली दिसत नाही. आरोग्य कर, अग्निशमन कर, पथकर, शिक्षण कर अशा अनेक कर लागू केले आहेत यातील लावलेले काही वेगवेगळे कर या संदर्भात प्रत्यक्षात नागरिकांना कोणतीही सोय देखील उपलब्ध झालेली नाही त्यामुळे घरमालकांमध्ये मोठ्या प्रमाणात असंतोष वाढत चाललेला असून त्याचप्रमाणे संभ्रम देखील आहे, या वाढीव कर मूल्यांकनबाबत पुनर्विचार करावा अशी मागणी वडगाव शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने निवेदनाद्वारे केली आहे

# पाचगणी नगरपरिषदेचा स्वच्छ्ता अभियानात देशपातळीवर डंका ; पुरस्कारात हॅटट्रिक

**पाचगणी :** स्वच्छ भारत नागरी अभियान अंतर्गत पाचगणी नगरपरिषदेने २०२३ साठीचा देशपातळीवरील पश्चिम विभागातील प्रथम क्रमांक प्राप्त करीत सलग तिसऱ्यांदा पुरस्कार घेत हॅट्रिक साधली आहे. हा पुरस्कार वितरण गुरुवार दिनांक ११ जानेवारी २०२४ रोजी केंद्र शासनाच्या गृहनिर्माण व शहरी विकास मंत्रालय यांच्या वतीने दिल्ली येथील भारत मंडपम या ठिकाणी पारितोषिक वितरण समारंभ पार पडणार आहे.

या पुरस्कारा करीता पांचगणी गिरीस्थान नगरपरिषदेस निमंत्रित करण्यात आले आहे. गृहनिर्माण व शहरी विकास मंत्रालय यांच्यावतीने दरवषी स्वच्छता अभियान राबवले जाते, या अभियानांतर्गत केंद्र सरकारने नियुक्त केलेले पथक वेगवेगळ्या निकषानुसार सर्वेक्षण करते व देशपातळीवर आणि राज्यपातळीवर विभागनिहाय क्रमांक दिले जातात. स्वच्छ सर्वेक्षण २०२३ साठी पांचगणी गिरीस्थान नगरपरिषदेस पश्चिम विभागात प्रथम क्रमांक प्राप्त झाला असून या निमित्ताने नगरपरिषदेचे कार्यक्षम प्रशासक तथा मुख्याधिकारी माननीय निखिल जाधव यांनी या कामगिरीबद्दल पांचगणी शहरातील नागरिकांचे तसेच स्वच्छता कर्मचाऱ्यांचे आणि सर्व पालिका कमर्चारी यांचे विशेष आभार मानले.



**पाचगणी नगरपरिषदेस स्वच्छ्ता अभियानात पश्चिम विभागात पहिल्यांदा २०१८ पुरस्कार प्राप्त झाला होता. त्यानंतर दुसऱ्यांदा २०२१ पुन्हा या पुरस्काराला गवसणी घातली होती. आता तिसऱ्यांदा पुरस्कार मिळवून पाचगणी नगरपरिषदेने मिळवून हॅट्रिक साधली आहे. विशेष म्हणजे प्रशासकीय कायर्काळात हा पुरस्कार प्राप्त झाला आहे.**

# क्रांतिवीर शाळेत कौशल्य विषयक प्रशिक्षण संपन्न


**म्हसवड :** क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी शाळा म्हसवड येथील विद्यार्थ्यांना विविध उद्योग, व्यावसायाच्या ठिकाणी नेऊन त्यांना सचित्र स्वरूपात कौशल्य विषयक प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम नुकताच यशस्वीपणे संपन्न झाला.

क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी शाळा म्हसवड यांचे तर्फे विद्यार्थ्यांसाठी विविध स्वरूपाचे कौशल्य विषयक प्रशिक्षण व मार्गदर्शन आयोजित केले होते. मुख्याध्यापिका सुलोचना बाबर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवण्यात आला. या माध्यमातून विद्यार्थ्यांना स्थानिक कारागीर, उद्योग, व्यवसाय, व्यापार इत्यादी बाबतचे कौशल्य विषयक मार्गदर्शन करण्यात आले.

म्हसवड कुंभार टेक येथील मडकी व्यवसायिक दीपक कुंभार यांच्या मडकी बनवण्याच्या व्यवसायाला विद्यार्थ्यांनी भेट दिली. मडकी बनवण्यासाठी लागणारे साहित्य, यंत्रसामग्री तसेच कौशल्य विषयी बाबीची माहिती दीपक कुंभार यांनी विद्यार्थ्यांना दिली. म्हसवड येथील नंद सायकल मार्ट चे ज्येष्ठ सायकल व्यवसायिक मारुती गोंजारी, व हनुमंत गोजारी यांच्या सायकल विक्री व दुरुस्ती या दुकानाला विद्यार्थ्यांनी भेट देऊन सायकल दुरुस्ती व त्यासाठी लागणारे आवश्यक साहित्य यांची माहिती प्रत्यक्ष कार्यातून घेतली. शाळेचे पालक व बुरुड व्यवसायीक अनिल सूयर्वंशी यांच्या टोपली विणकाम दुकानात जाऊन बांबू पासून बनवल्या जाणाऱ्या विविध गृह उपयोगी साहित्याची माहिती घेतली तसेच त्यासाठी आवश्यक असणारे कच्चे मटेरियल व साधनसामग्री बाबत ही ज्ञान मिळविले. या निमित्ताने चमर्कार व्यवसाय, चप्पल विक्री व दुरुस्ती त्यासाठी आवश्यक साहित्याची ओळख करून घेतली. कापड विक्री दुकान त्यातील मांडणी, मोजमाप करण्याचे साहित्य याबरोबरच इकबाल ऑटो गॅरेज या दुचाकी दुरुस्ती दुकानाला भेट देऊन वाहनाचे किरकोळ घोटाळे, व दुरुस्ती साहित्या बाबत ची माहिती घेतली.सदरचे कौशल्य विषयक प्रशिक्षण यशस्वीपणे पार पाडण्यासाठी मुख्याध्यापिका सुलोचना बाबर, उपशिक्षक तुकाराम घाडगे,दस्तगीर आतार,व संजय नरळे,प्रतिमा वाघमोडे,उषा जाधव यांनी विशेष परिश्रम घेते.

# छगन भुजबळ मंत्री झाल्यानंतर प्रथमच सोलापूर दौऱ्यावर

**सोलापूर :** राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री हे दिनांक ०५ व ०६ जानेवारी २०२४ रोजी सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत असून, त्यांचा दौरा कार्यक्रम पुढील प्रमाणे राहील. शुक्रवार दिनांक ०५ जानेवारी २०२४ रोजी सायंकाळी ६ वाजता मोटारीने सांगलीहून पंढरपूरकडे प्रयाण, रात्री ८ वाजता शासकीय विश्रामगृह, पंढरपूर येथे आगमन व मुक्काम शनिवार दिनांक ०६ जानेवारी



२०२४ रोजी सकाळी राखीव. दुपारी ४ वाजता ओबीसी आरक्षण बचाव एल्गार सभा, पंढरपूर. नंतर पंढरपूरहून पुणेकडे मोटारीने प्रयाण.

# औंधरोड येथील डॉ.आंबेडकरांच्या पुतळ्यासाठी निधी उपलब्ध करून त्वरित बसवण्यात यावा

## कॅटलिस्ट फाउंडेशनचे सुनील माने यांची महापालिका आयुक्तांकडे मागणी

**पुणे :** औंध रोड येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा बसवणे नियोजित आहे. यासबंधी सर्व प्रक्रिया पूर्ण करून लवकरात लवकर हा पुतळा येथे बसवावा तसेच येथे सुशोभीकरणासाठी ५० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून द्यावा अशी विनंती कॅटलिस्ट फाउंडेशन च्या वतीने सुनील माने यांनी पुणे महानगरपालिकेचे आयुक्त विक्रमकुमार यांच्याकडे केली. याबाबतचे निवेदन त्यांनी महापालिका आयुक्त यांना दिले. औंध रोड येथील डॉ.आंबेडकर चौक येथे महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा बसवण्याचे नियोजन पुणे महापालिकेमार्फत



करण्यात आले आहे. यासाठी सर्व परवानग्या घेण्याचे काम देखील पूर्ण झाले आहे. मात्र या कामासाठी बऱ्याच कालावधी होऊन देखील विलंब होत आहे. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा लवकरात लवकर बसविण्यात यावा या मागणीसाठी सुनील माने यांनी महापालिका आयुक्तांना विनंती केली आहे. हा पुतळा बसवण्यासाठी प्रशासकीय पूतर्ता आणि टेंडर प्रक्रिया सुरु करण्यासाठी सबंधित अधिकाऱ्यांना आपण निर्देश द्यावेत. तसेच या पुतळ्याच्या चौथरा सुशोभीकरणासाठी महापालिकेकडून ५० लाख रुपयांची वित्तीय तरतूद करावी. लवकरच महापालिकेचा अथर्संकल्प तयार केला जाणार आहे. त्यामुळे या निधीची तरतूद अथर्संकल्पात करावी अशी विनंती आयुक्तांकडे केली. याबाबत सकारात्मक विचार करण्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली आहे.

# प्रभागातील अवैध धंदे बंद करा संवाद सभेत नागरीकांचा एल्गार

## डॉ. सिद्धार्थ धेंडे यांचा प्रभाग दोन मध्ये संवाद सभेचा अनोखा उपक्रम



**हडपसर ( पुणे ) :** शाळा परिसरात व नागरी वस्तीत अवैध धंद्यामुळे अनेक समस्या निर्माण होत असून हुल्लडबाजांवर जरब बसवा ,अवैध धंदे करणाऱ्यांच्या मुसक्या आवळा. नियमबाह्य डीजे वाजविणाऱ्यांवर कडक कारवाई करा. या मागण्यांसह अनेक समस्यांवर बोट ठेवत, प्रभागातील चुकीच्या कामाविरोधात संवाद सभेतून नागरिकांनी एल्गार पुकारला पुणे महापालिकेच्या प्रभाग दोन मध्ये 'नागरिकांचे संरक्षण' या विषयावर गुरुवारी संवाद सभेचे आयोजन करण्यात आले होते. माजी उपमहापौर डॉ. सिद्धार्थ धेंडे यांच्या पुढाकाराने हा अनोखा उपक्रम राबविण्यात आला होता. पोलिस आणि महापालिका अधिकारी यांच्या उपस्थितीत आयोजित या सभेत नागरिकांनी आपल्या समस्यांचा पाढा वाचला.

या वेळी येरवडा पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळकृष्ण कदम, येरवडा क्षेत्रीय कार्यालयाचे सहायक आयुक्त विजय नायकल, येरवडा पोलीस स्टेशनचे पोलिस उपनिरीक्षक डोंबाळे, कल्याणीनगर विभाग महावितरणचे सहायक अभियंता संतोष तळपे आदीसह प्रभागातील नागरिक, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. येरवडा पोलिस स्टेशनचे अधिकारी, तसेच महापालिका अधिकारी यांनी नागरिकांच्या मागण्या नमूद करून घेतल्या. त्यावर कार्यवाही केली जाणार आहे असे सांगितले.

या वेळी येरवडा पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळकृष्ण कदम म्हणाले की, प्रभागातील नागरिकांनी मांडलेल्या अडचणींचे निराकरण करू. तक्रारींची दखल घेऊन शाळेच्या आवारात हुल्लडबाजी करणाऱ्यांवर व अवैध धंद्यावर. कारवाई करू.लेखी तक्रार देणाऱ्या नागरिकांचे नाव गुप्त ठेवले जाईल. मात्र चुकीचे काम करणाऱ्या लोकांवर जरब बसवू, असे आश्वासन पोलिस निरीक्षक कदम यांनी दिले.

येरवडा भागातील प्रभागात शाळांच्या परिसरात अवैध धंद्याच्या ठिकाणी हुल्लडबाज थांबलेले असतात. त्याचा विद्यार्थी आणि विद्यार्थ्यांनी यांना त्रास होतो. त्यांच्यावर आळा घाला. प्रभागातील पदपथ मोकळे करा. अतिक्रमणवर कारवाई करा. शाळांनी मुलांच्या मोबाईल वापरावर निर्बंध घालावे. शाळांच्या बाहेर सीसीटीव्ही बसवावे. प्रभागातील दारू विक्री, गुटखा विक्री, अवैध धंदे बंद करावेत. क्राईम स्पॉट, चौक मोकळे करणे, मोकळ्या जागेत होणारे चुकीचे काम थांबवा. रात्री दहा नंतर वाजणारे डीजे बंद करावेत. त्याचा वयोवृद्ध लोकांना त्रास होतो. नियमबाह्य डीजे वाजविणाऱ्या लोकांवर कारवाई करावी. कालच विमाननगर येथे गॅस सिलेंडरचे स्फोट झाले आहेत. खबरदारी म्हणून प्रभाग दोन मधील बेकायदेशीर गॅस विक्री करणाऱ्यांवर कारवाई करावी. प्रभागातील भिंतींवर चुकीचे केलेलं पेंटिंग काढून भिंत सुशोभित करा. आदींसह विविध मुद्दे नागरिकांनी संवाद सभेत मांडले.

माझ्या प्रभागातील विविध समस्यांवर नागरिकांकडून सातत्याने तक्रारी येत होत्या. काही जण लेखी तर काही जण वॉट्सप वर मेसेज करून सांगत होते. नागरिकांच्या या तक्रारी प्रत्यक्ष पोलिस आणि महापालिका अधिकाऱ्यांसमोर मांडल्या जाव्यात या उद्देशाने संवाद सभा आयोजित केली. त्यामध्ये नागरिकांनी समस्या मांडल्या. त्या सोडविण्याबाबत पोलिस आणि महापालिका अधिकारी यांनी सकारात्मकता दर्शवली, प्रभागातील सर्व अवैध धंदे बंद करण्यात यावे, गुन्हेगारांवर आळा बसवावा.

**- डॉ. सिद्धार्थ धेंडे, माजी उपमहापौर, पुणे महापालिका**

# महात्मा फुले व सावित्रीबाई फुले दाम्पत्यांना भारतरत्न पुरस्कार मिळाला पाहिजे

## रिपाइं ( आठवले ) पक्षाची मागणी



हडपसर ( पुणे ) : भारतीय महिलां स्त्री शिक्षण हक्कासाठी लढणा-या फुले दांपत्यांनी खुप कष्ट घेतले , शिक्षणाच्या प्रर्णत्या भारतीय पहिल्या शिक्षिका सर्वोत्तम समाजसेविका क्रांतीज्योती, ज्ञानज्योती, सावित्रीबाई फुले व महात्मा ज्योतिराव फुले दांपत्यांना भारतरत्न पुरस्कार देण्यात यावा अशी मागणी रिपब्लिकन पाटी ऑफ इंडिया ( आठवले ) पक्षाच्या वतीने करण्यात आली.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्ताने समता भूमी, फुलेवाडा, गंजपेठ या ठिकाणी रिपब्लिकन पक्षाच्या वतीने सावित्रीबाई फुले व महात्मा जोतिबा फुले यांना शरह अध्यक्ष संजय सोनवणे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला त्याप्रसंगी राज्य सचिव बाळासाहेब जानराव यांनी महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांना भारतरत्न पुरस्कार मिळाला पाहिजे अशी मागणी केली अशोक कांबळे, अशोक शिरोळे, महादेव दंदी, संगिता आठवले, शशीकला वाघमारे, सुनिता वाघमारे, मिनाज मेमन, चांदणी गायकवाड, रेश्माताई, शशिकांत मोरे, रमेश मोरे, चिंतामण जगताप, संतोष खरात, भरत भोसले, फिरोज खान, हनुमंत गायकवाड, अविनाश गायकवाड, सुरेश सोनवणे, बाळासाहेब जगताप, सुभाष शिंदे, राहुल मोरे, इ. प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# आयोध्या येथून आलेल्या श्री राम लल्लाच्या शेवाळेवाडीत अक्षदा वाटप




**हडपसर ( पुणे ) :** प्रभु श्रीरामाचाच्या आयोध्या येथून आलेल्या अक्षदाचे शेवाळेवाडीत वाटप करण्यात आले.

शेवाळेवाडीत पुणे जिल्हा भारतीय जनता पक्षाचे सरचिटणीस राहुल शेवाळे. यांच्या घरापासून या पवित्र अक्षदा वाटप कार्याला सुरुवात करण्यात आली , यावेळी प्रभू श्री रामाची प्रतिमा , अक्षदा व बावीस जानेवारी रोजी होणाऱ्या मूती प्रतिष्ठापना कार्यक्रमाची माहिती चे पत्रक यावेळी नागरीकांना घराघरात देण्यात आले , मांजरी व शेवाळेवाडी परिसरातील वीस हजार घरात या पवित्र अक्षदा पोहचविण्यासाठी आम्ही तयारी केली असल्याचे माहिती शेवाळेवाडी विभागाचे प्रमुख मिलिंद सुरंगे यांनी दिली , यावेळी राहुल शेवाळे व माजी सरपंच प्रतिमा शेवाळे यांच्या हस्ते या कार्याचा प्रारंभ करण्यात , बावीस जानेवारी रोजी होणाऱ्या मूती प्रतिष्ठापना कार्यक्रमाची रूपरेषा यावेळी ठरविण्यात आली या कार्यक्रमासाठी डॉक्टर स्वप्नील चतुर , संतोष जगताप , रुपेश बक्षी, मिलिंद सुरंगे , समीर पानपट हे मान्यवर उपस्थित होते.

# मराठा समाजासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचा महत्त्वाचा निर्णय

**सोलापूर :** राज्य मागासवर्ग आयोगाने मराठा समाज व खुल्या प्रवर्गाचे सर्वेक्षणाच्या तयारीच्या सूचना दिल्या आहेत.त्याअनुषंगाने प्रशासनाकडून जिल्ह्यात घरोघरी मराठा व खुल्या प्रवर्गाचे सर्वेक्षण करण्याची तयारी सुरू केली असून, प्रत्येक तालुक्यात विशेष कक्षाची स्थापना करण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक गावांत सर्वेक्षण करण्याची जबाबदारी ग्रामसेवक, तलाठी, शिक्षक, कृषी सहाय्यक व कर्मचाऱ्यांकडून करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली. मराठा समाज व खुल्या प्रवर्गाचे सर्वेक्षणाच्या अंमलबजावणीबाबत जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे, अपर जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब कांबळे, उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर, उपजिल्हाधिकारी



रोहयो चारुशीला देशमुख जिल्हा प्रशासन अधिकारी नगरपालिका वीणा पवार, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी गावसाने जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, जिल्हा जंलसंधारण अधिकारी श्री. दामा, जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, गटविकास अधिकारी तसेच संबधित अन्य विभागाचे विभागप्रमुख उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी म्हणाले, जिल्ह्यातील सर्वेक्षणाच्या तयारीला जिल्हा प्रशासनाने सुरुवात केली आहे. राज्य मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष न्यायमूती सुनील शुक्रे यांच्या अध्यक्षतेखालील समितीने मराठा समाजाचे मागासलेपण निश्चितीसाठी सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक आधारावर निकष अंतिम केले आहेत.

निकषांच्या आधारे राज्यातील मराठा समाजाचे सर्वेक्षण केले जाणार आहे. यासाठी जिल्हा प्रशासनाकडून आवश्यक कमर्चारी वर्ग पुरविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. सर्वेक्षणासाठी तयार करण्यात येणारे सॉफ्टवेअर ॲप्लीकेशन मोबाईलवरही वापरता येणार असल्याने सर्वेक्षणासाठी नियुक्त कर्मचाऱ्यांना युजर आयडी व पासवर्ड देण्यात येणार आहे. यासाठी नियुक्त कर्मचाऱ्यांचे नाव, पदनाम, कामाचे ठिकाण, तालुका, जिल्हा ही माहिती आयोगाच्या कार्यालयास द्यावयाची असल्याने माहिती प्राधान्याने संकलित करावी. या सर्वेक्षणासाठी १५० ते २०० कुटुंबांसाठी एक कमर्चारी या प्रमाणात कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येणार आहे. तालुक्यातील कर्मचाऱ्यांची माहिती संकलित करताना नगरपालिका क्षेत्रातील कर्मचाऱ्यांची ही माहिती संबंधित मुख्याधिकारी यांच्याकडून प्राप्त करून ती समाविष्ट करून एकत्रित माहिती पाठविण्याच्या सूचना प्रांताधिकारी आणि तहसीलदार यांना जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी यावेळी दिल्या.

सर्वेक्षणासाठी जिल्हा स्तरावर नोडल अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी, तर निवासी उपजिल्हाधिकारी सहायक नोडल अधिकारी तर प्रत्येक तालुका स्तरावर तहसीलदार नोडल अधिकारी, नायब तहसीदार सहायक नोडल अधिकारी असतील. महापालिका स्तरावर महापालिका आयुक्त नोडल अधिकारी आणि महापालिका उपायुक्त सहायक नोडल अधिकारी त्याचबरोबर नगरपरिषद व नगरपंचायत वार्ड प्रभाग स्तरावर प्रभाग अधिकारी नोडल अधिकारी म्हणून असतील तर अन्य एक अधिकारी सहाय्यक नोडल अधिकारी म्हणून कामकाजाची जबाबदारी असणार आहे.

# मोदी आवास घरकूल योजनेअंतर्गत ८६५ पात्र लाभाथीना घरकुल मंजूर

**पुणे :** राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागातर्फे इतर मागास प्रवर्ग आणि विशेष मागास प्रवर्गातील लाभाथीकरिता राबविण्यात येणाऱ्या मोदी घरकूल योजनेअंतर्गत ८६५ पात्र लाभाथींना घरकुल मंजूर करण्यात आले. मोदी आवास घरकूल योजना ग्रामीण २०२३-२४ अंतर्गत पुणे जिल्ह्यातील इतर मागास प्रवर्गातील ८६५ पात्र बेघर लाभाथीना जिल्हा परिषदेचे मुख्य कायर्कारी अधिकारी रमेश चव्हाण यांच्याहस्ते घरकुलासाठी ऑनलाईन मंजुरी देण्यात आली. यावेळी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक शालिनी कडू तसेच सर्व तालुक्यांचे गट विकास अधिकारी उपस्थित होते.

या लाभाथीना तालुकास्तरावरून थेट लाभाथीच्या खात्यात टप्पानिहाय घरकुलाचे अनुदान जमा केले जाईल. या सर्व लाभार्थींचे घरकुलाचे बांधकाम तात्काळ सुरू करण्याचे निर्देश चव्हाण यांनी गटविकास अधिका[]यांना दिले. संबंधित सर्व लाभार्थ्यांनी घरकुलाचे बांधकाम त्वरीत सुरु करुन किमान कालावधीत पूर्ण करण्याचे आवाहनदेखील त्यांनी केले. इच्छुक पात्र नागरिकांनी अधिक माहितीसाठी पंचायत समितीशी संपर्क साधावा आणि ग्रामपंचायत किंवा पंचायत समितीत अर्ज सादर करावा, असे आवाहन श्रीमती कडू यांनी केले आहे.

# राज्याबाहेरील प्रक्षेत्र भेट कार्यक्रमासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**पुणे :** एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान सन २०२३-२४ अंतर्गत मनुष्यबळ विकास कार्यक्रमांतर्गत राज्याच्याबाहेरील अभ्यासासाठी प्रक्षेत्र भेट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आले असून इच्छुक शेतकऱ्यांनी १० जानेवारीपर्यंत तालुका कृषी अधिकारी किंवा उपविभागीय कृषी अधिकाऱ्यांकडे अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमांतर्गत राज्यातील फलोत्पादक शेतकऱ्यांसाठी तसेच शेतकऱ्यांमध्ये फलोत्पादन विषयक जिज्ञासा व आवड निर्माण करणे, फलोत्पादनाची प्रतवारी, हाताळणी, शेतस्तरावर प्रक्रिया उद्योग स्थापन करणे, फलोत्पादनाच्या विपणन व्यवस्थेचा अभ्यास करणे, आधुनिक लागवड तंत्रज्ञानाबाबत व काढणी पश्चात तंत्रज्ञानाबाबत सखोल शास्त्रोक्त ज्ञान उपलब्ध करून देणे व या माध्यमातून शेतकऱ्यांनी स्वतःची व त्याचबरोबर समूहाची फलोत्पादन विषयक उन्नती करणे यासाठी राज्याबाहेर प्रक्षेत्र भेट दौरा आयोजित करण्यात आला आहे.

या दौऱ्यात फळबाग, भाजीपाला, फुले लागवड, विदेशी फळपीक लागवड तसेच शेडनेटगृह व हरितगृह उभारणी, फळप्रक्रिया याबाबत आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती मिळणार आहे, अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे यांनी दिली आहे.

# हडपसर भूमीत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्मारक व्हावे

## हडपसर मधील विविध संघटनां व अर्जुनराव बनकर प्रतिष्ठानची मागणी



हडपसर / प्रतिनिधी

स्त्री शिक्षणाची जननी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९२ व्या जयंतीनिमित्त हडपसर गांधी चौक येथे सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून विविध संघटनांकडून अभिवादन करण्यात आले. माजी राज्यमंत्री बाळासाहेब शिवरकर यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून प्रतिमेचं पूजन करण्यात आले.

याप्रसंगी पंढरपूर ते घुमान पंजाब २७०० किलोमीटरचा सायकल वारी करून संतांच्या विचारांचा प्रसार करणा[]या जनार्दन शिवरकर व अशोक चौधरी यांचा सन्मान अर्जुनराव बनकर प्रतिष्ठानच्या वतीने माजी राज्यमंत्री बाळासाहेब शिवरकर व महेंद्र बनकर यांच्या हस्ते

**क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे हडपसर मध्ये बरेच दिवस वास्तव्य होते,हडपसर ही सावित्रीबाई फुलेंची कमर्भुमी असल्याकारणाने शासनाने हडपसर मध्ये सावित्रीबाई फुले यांचे भव्य असे स्मारक उभारण्यात यावे करावे अशी मागणी बनकर प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेंद्र बनकर यांनी हडपसर मधील सर्व संस्थांच्या वतीने याप्रसंगी केली. ' सत्यशोधक '. या चित्रपटाचे पोस्टसर्चे प्रमोशन यावेळी राजयमंत्री बाळासाहेब शिवरकर यांच्या हस्ते सर्व संस्थांच्या वतीने करण्यात आले, यावेळी सूत्रसंचालन सतीश भिसे व मुकेश वाडकर यांनी केले तर आभार बनकर प्रतिष्ठानचे महेंद्र बनकर यांनी केले.**

करण्यात आला. याप्रसंगी माजी नगरसेवक विजय देशमुख, सुनील बनकर, दिलीप तुपे, गणेश फुलारे, बाळासाहेब हिंगणे, पांडुरंग तुपे, विवेक तुपे, जयप्रकाश जाधव, शितल संजय शिंदे, पल्लवी प्रशांत सुरसे, विद्या होडे, मीना थोरात, सीमा शेंडे, मनीषा राऊत, तृप्ती टिळेकर , विक्रम आल्हाट विवेक आल्हाट, सतीश आल्हाट सचिन आल्हाट विलास शेलार महादेव वाघमोडे, हनुमंत मेटे, नंदू ननवरे, महेश बनकर, सुधीर होले, डॉ. किशोर शहाणे, बाबा बनकर,ठकसेन सातव, चंद्रकांत टिळेकर, विशाल बोरावके, विश्वास कावरे ,जयप्रकाश जाधव, जीवन जाधव, महेश टेळे, बबन जगताप, सुभाष जंगले, निलेश म्हैसणे, गणेश वाडकर, मच्छिंद्र वाडकर, पोपट वाडकर, महेश पवार, रमजान शेख आदी नागरिक उपस्थित होते.

# कंत्राटी डॉक्टरांच्या मानधनात वाढ करण्यासाठी प्रस्ताव तयार करा- उपमुख्यमंत्री अजित पवार

**पुणे :** वैद्यकीय उपचारांद्वारे रुग्णांचे प्राण वाचविण्यासाठी कंत्राटी डॉक्टर करीत असलेले कार्य महत्वाचे असून वैद्यकीय शिक्षण विभागाने त्यांच्या मानधनात वाढ करण्यासाठी प्रस्ताव तयार करावा; त्यासाठी वित्त विभागाच्या माध्यमातून सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दिली.

बै. जी. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि ससून सर्वोपचार रुग्णालयातील विविध विकासकामांच्या लोकार्पण प्रसंगी ते बोलत होते. वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, खासदार सुनिल तटकरे, आमदार सुनील कांबळे, रविंद्र धंगेकर, वैद्यकीय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव दिनेश वाघमारे, जिल्हाधिकारी डॉ.राजेश देशमुख, वैद्यकीय शिक्षण संचालक डॉ. दिलीप म्हैसेकर, महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. विनायक काळे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण आदी उपस्थित होते.

सवर्सामान्य रुग्णांवर उत्तम उपचार व्हावेत यासाठी आरोग्य सुविधांवर भरीव तरतूद करण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचे सांगून पवार पुढे म्हणाले, रुग्ण सेवेसाठी चांगले डॉक्टर उपलब्ध व्हावे यासाठी डॉक्टरांचे मानधन वाढविणे गरजेचे आहे. कोरोना काळात वैद्यकीय अधिकारी कर्मचाऱ्यांनी जोखीम स्वीकारून रुग्णसेवा केल्यामुळे त्यांचे तसेच वैद्यकीय सुविधांचे महत्त्व समजून आले. या काळात ससून रुग्णालयाच्या उभारणी सुरु असलेल्या नव्या इमारतीचा उपयोगही कोरोना बाधितांवर उपचारासाठी करण्यात आल्याने इतर पायाभूत सुविधा करता आल्या नव्हत्या.

ससून रुग्णालयाच्या वाढत्या गरजा लक्षात घेता रुग्णालय इमारतीच्या विस्तारासाठी आवश्यक जागेबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा करण्यात येईल, असे सांगून उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, ससून रुग्णालयात काळानुसार आवश्यक बदल करण्यासाठी अधिकाऱ्यांनी खाजगी रुग्णालयातील उत्तम सुविधांचा अभ्यास करून एका महिन्यात आवश्यक बाबींसाठी प्रस्ताव सादर करावा. सामान्य रुग्णांसाठी ससून रुग्णालय महत्त्वाचा आधार असल्याने येथे अत्याधुनिक सुविधांच्या निमितीसाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही.

रुग्णालयाच्या नव्या गरजा लक्षात घेता ११ मजल्याची सर्व सुविधांनी युक्त नवी इमारत उभारण्यात आली आहे. विशेषोपचारासाठी सवर्सामान्य गरीब माणसाला अत्याधुनिक सुविधांच्या आधारे आरोग्य उत्तम सुविधा मिळावी असा शासनाचा प्रयत्न आहे. गोरगरीब रुग्णांचे जीव वाचवण्यासाठी या सुविधांचा उपयोग होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना क्रीडांगणासाठी अतिरिक्त सुविधा सामाजिक उत्तरदायित्व निधीतून करण्यात येतील, अशी ग्वाहीदेखील त्यांनी यावेळी दिली.